**प्रेस नोट** **ठाणे शहर पोलीस**

**दि. २२/०१/२०१८**

**'' गुन्हे शाखा, भिवंडी युनिट-२ यांनी ड्रायव्हींग लायसन्स, ॲटो रिक्षा परमीट बनविण्याकरीता बनावट कागदपत्रांचा वापर करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला. ''**

दिनांक १८/०१/२०१८ रोजी गुन्हे शाखा, भिवंडी युनिटला दि. १८/०१/२०१८ रोजी बातमी मिळाली की काही इसम पोलीस चारीत्र पडताळणी सर्टीफिकेट (PVR), बनावट तयार करून त्याचा उपयोग आर.टी.ओ कार्यालयात रिक्षा बॅच काढणे, रिक्षा परमीट काढणे करीता वापरत आहेत. अशी बातमी मिळाल्याने बातमीच्या अनुंषगाने धामणकरनाका येथील केजीएन संजरी ॲटो कन्सल्टन या ठिकाणी छापा घातला असता त्या ठिकाणी १) नफीज सगीर अहमद फारुकी वय ३८ वर्षे रा.घर नं. ८००/२ गौसीया मंजील, गैबीनगर, भिवंडी, २) नाजील नवाज अहमद मोमीन वय २८ वर्षे रा. मदनी अपार्टमेंट, पहिला मजला, रूम नं. ६, ७ खोटाला मस्जीदच्या बाजुला, मंगलबाजार स्लॅप, हापसन आळी, भिवंडी हे मिळून आले त्यांचे कब्जात पोलीस बनावट चारीय पडताळणी सर्टीफिकेट (PVR), बनावट महाराष्ट्र शासनाचा रहिवाशी दाखला (डोमीसाईल सर्टीफिकेट), रिक्षा परमीटचे कागदपत्रे, मोटार वाहनाचे विम्याचे कागदपत्रे, लॅपटॉप, संगणक, सह मिळून आले. त्यांचे कडे विचारपुस करता ते बनावट कागदपत्रांचे आधारे भिवंडीतील राहणारे इसमांना लायसन्स, बॅच, ॲटो रिक्षा परमीट जास्त पैसे घेवुन आर.टी.ओ. कार्यालयातुन बनवुन देत असल्याबाबत त्यांनी सांगितले. तसे त्यांचे साथीदार ३) मोहमद इस्माईल मोहमद रजा अंन्सारी, उर्फ पप्पु वय ३४ वर्षे, रा. घर नंबर ३२२/१, मुस्ताक सेठ चाळ, बाळा कम्पौड, चौथा निजामपुरा, ता.भिवंडी, ४) संगमेश्वर मरोळसिध्द स्वामी, वय ४२ वर्षे, रा. श्री. सिध्दी अपार्टमेन्ट, बी/जी-१, शेलारगांव, ता.भिवंडी.हे देखील बनावट कागदपत्रांच्या आधारे आर.टी.ओ. कार्यालयातुन लायसन्स, परमिट बनवीत असतात अशी माहीती मिळाल्याने अ.क्र. ३ चे दुकाजात व अ. क्र. ४ चे घरी छापा टाकून त्याचे कडुन बनावट शाळ सोडल्याचे दाखले, बोगस डॉक्टरचा शिक्का, तसेच आरटीओ अधिकारी यांचा शिक्का, बजाज अलायन्झ इन्शुरन्स कपंनीचा शिक्का, असे शिक्के वापरुन तयार केलेले बनावट कागदपत्रे मिळून आली. त्यावरून पोउपनि लक्ष्मण जोरी यांनी सरकार तर्फे फिर्याद दिल्याने भोईवाडा पोलीस स्टेशन गु.रजि.नं. I १४/२०१८ भादविक ४६५,४६६,४६८,४७२,४७४, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदर आरोपींकडुन एकुण ४५ बनावट पोलीस चारी चारीत्र पडताळणी दाखले(PVR), २० बनावट शाळा सोडल्याचे दाखले, ३४ बनावट डोमीसाईल दाखले, ४४ बनावट विम्याचे दाखले ,१ आरटीओ अधिकारी यांचा बनावट शिक्का, १ डॉ. मिश्रा यांचा बनावट शिक्का, १ बजाज अलायन्झ इन्शुरन्स कपंनीचा शिक्का, ४९ वाहन चालकांचे पक्के व लर्निंग लायसन्स, ३ लॅपटॉप, ३ संगणक, ५ मोबाईल फोन, असा एकूण १,६७,५०० /-रू. कि.चा. मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

अटक आरोपी याचे पोलीस कस्टडी मध्ये चौकशी करून आरोपींची घरझडती व दुकानांची झडती घेतली असता त्यात एकूण २८४ फाईली ( २११ ॲटो रिक्शाचे पासींग फाईल, ३९ इंन्शयुरंन्स च्या फाईली, ३४ लर्नीग लायसन्स फाईल ) मिळून आल्या आहेत.

सदरची कामगिरी ही मा. पोलीस आयुक्त श्री. परम बीर सिंह, मा. पोलीस सह आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय, मा. अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. मंकरद रानडे, मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. अभिषेक त्रिमुखे मा.सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे, ठाणे श्री. मुकुंद हातोटे व बी.आर. भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि श्री शितल राऊत, सपोनि श्री. सुरेश चोपडे, प्रकाश पाटील, पोउपनि श्री. संतोष चौधरी, श्री. रविंद्र पाटील, श्री. लक्ष्मण जोरी व पोलीस स्टाफ यांनी केली आली आहे.


महाराष्ट्र पोलीस


महाराष्ट्र पोलीस